या योजनेचा लाभ घेताना लाभार्थीने त्यात ज्या विक्री व्यवस्थापन घटकांतर्गत लाभ घ्यावयाचा आहे. त्यासाठी सुविधा उभारण्याकरिता पूर्व परवानगीकरिता अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सादर करावयाचा असून, पूर्व परवानगी नंतरच सुविधांची सुधारणा करावयाची आहे. तसेच पुणे, मुंबई, आणि नागपूर या शहरांसाठी भाजीपाला पुरवठा करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या जिल्ह्यांसाठी संकलन व प्रतवारी केंद्र उभारणी तसेच मोटाराईज्ड व्हेडींग कार्ट या दोन घटकांसाठीच अनुदान देय आहे. मोटाराईज्ड व्हेडींग कार्ट घटकांअंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थीला भाजीपाला विक्री ही त्याचा जिल्हा ज्या शहरासाठी भाजीपाला पुरवठा करणारा जिल्हा म्हणून निवडलेला आहे. त्या शहरातच (पुणे/मुंबई/नागपूर) करावयाची आहे.

**पूर्व परवानगीसाठी अर्ज करताना सादर करावयाची कागदपत्रे...**

१. गटाचे नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स
२. गटाचे अध्यक्ष, सचिव व सदस्यांची यादी (सोबत जोडलेल्या नमुन्यात)
३. गटाचे अध्यक्षाचे फोटो ID, गटाचे बँक पासबुक झेरॉक्स
४. लाभार्थीचे फोटो ID व त्याचे बँक पासबुक झेरॉक्स
५. गटाचा ठराव (सोबत जोडलेल्या नमुन्यानुसार)
६. शहरात भाजीपाला विक्री करण्यासाठी भाजीपाला पुरवठ्या बाबतची माहिती (Backword Linkages)
७. शहरात भाजीपाला विक्री करण्यासाठी केलेली उपाय योजना (Forward Linkages )
८. तालुका कृषी अधिकारी/झोनल अधिकारी यांचे शिफारस पत्र
९. रू.१००/– च्या स्टँप पेपरवर करारनामा (नोटराईज्ड केलेला)
१०. रू.१००/– च्या स्टँप पेपरवर हमीपत्र
११. लाभार्थी हा गटातील सदस्य नसल्यास व त्यास गटाने पुरस्कृत केले असल्यास त्यांच्याकडे भाजीपाला विक्रीचे शॉप ॲक्ट लायसन्स असणे आवश्यक.

पूर्व परवानगीसाठी कागदपत्रांची पूर्तता करुन पूर्व परवानगी प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प उभारणी करावयाची आहे. प्रकल्प उभारणीसाठी झालेल्या खर्चाच्या मूळ बिलांसह प्रकल्पाचे फोटो तसेच इतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर मोका तपासणी करण्यात येते. त्यानंतर संबधित लाभार्थीस अनुदान देण्यात येते.

पुणे शहरात सध्या कोथरुड, बाणेर येथे शेतकरी आठवडे बाजार सुरु असून याठिकाणी शेतकरी मोठ्या प्रमाणात थेट भाजीपाला विक्रीसाठी येतात. अशा प्रकारचे शेतकरी बाजार, शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपन्या सुरु करु शकतात. तसेच शेतकऱ्यांना थेट ग्राहकांना भाजीपाला विक्रीची सुविधा उपलब्ध करुन देऊ शकतात. शहरी भागासाठी थेट भाजीपाला पुरवठा योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी घेऊन, भाजीपाला विक्री मधील मध्यस्थांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे ग्राहकांना ताजा, स्वच्छ भाजीपाला वाजवी दरात उपलब्ध करुन द्यावा.

संपर्क : ०२०–२४५२८२९९

# सहकार विभागाच्या योजना

## पीक उत्पादन प्रोत्साहन योजना

**डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना :** राज्यातील शेतकऱ्यांना सहकारी कृषि संस्थेमार्फत पीक कर्जावरील व्याजदरात वसुलीशी निगडित प्रोत्साहनात्मक सवलत देण्याची ही योजना आहे. या योजनेअंतर्गत सहकारी पतसंस्थेकडून पीक कर्ज घेणाऱ्या व त्याची प्रतिवर्षी ३० जूनपर्यंत संपूर्ण परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याज सवलत देण्यात येते. थकीत कर्जास तसेच मध्यम मुदत व दीर्घ मुदत कर्जाला ही योजना लागू नाही.

पात्र कर्जाची मर्यादा ३ लाख करण्यात आली आहे. ही योजना विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था, राष्ट्रीयीकृत बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व खासगी बँकांकडून घेतलेल्या अल्प मुदत पीक कर्जासही लागू आहे. त्यानुसार कृषि पतसंस्थांमार्फत व बँकांमार्फत मिळणाऱ्या पीक कर्जावरील व्याजदराशी निगडित व्याज सवलत देण्यात येत आहे. रु. १ लाखापर्यंतच्या पीक कर्जावर वार्षिक ३ टक्के व त्यापुढील रु. ३ लाखांपर्यंतच्या पीक कर्जावर वार्षिक १ टक्का दराने व्याज सवलत लागू आहे.

**उपसा जलसिंचन सहकारी संस्थांना अर्थसाह्य :** या योजनेअंतर्गत उपसा जलसिंचन संस्थांच्या योजना उभारणीसाठी बँकांनी मंजूर केलेल्या प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के अथवा रु. १०० लाख यांपैकी जी रक्कम कमी असेल, तितक्या रकमेइतके अनुदान शासनाकडून देण्यात येते. ही रक्कम उपसा जलसिंचन सहकारी संस्थेच्या योजनेस अर्थसाह्य करणाऱ्या बँकेस अदा केली जाते व त्यानंतर कर्जदाराच्या नावावर कर्जाच्या प्रमाणात वर्ग केली जाते. पात्रतेच्या अटी आहेत.

**सहा टक्के दराने व्याज परतावा :** या योजनेनुसार खरीप व रब्बी हंगामात राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका, खासगी बँका आणि ग्रामीण बँका यांच्याकडून रु. ३ लाखांपर्यंतच्या अल्प मुदत पीक कर्जपुरवठ्यावर बँकांना व्याज परताव्याचा लाभ खालीलप्रमाणे देण्यात येतो...

१. व्याज परताव्याच्या रकमेचा हिशेब कर्ज दिल्याच्या तारखेपासून ते कर्ज परतफेड होणाऱ्या तारखेपर्यंत किंवा सदर कर्ज परतफेडीची मुदत संपेल त्या तारखेपर्यंत यांपैकी जी तारीख आधीची असेल, ती विचारात घेऊन करण्यात येते.

२. ज्या जिल्हा बँका राज्य सहकारी बँकेकडून फेरकर्ज घेतात व ज्या बँकांचे एन.पी.ए.चे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा कमी आहे, अशा जिल्हा बँकांना राज्य शासनाकडून १.२५ टक्के दराने व्याज परतावा देण्यात येतो. तसेच, ज्या जि.म.स. बँकांचे एन.पी.ए.चे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. त्यांना १.७५ टक्के दराने व्याज परतावा देण्यात येतो. जिल्हा बँकांनी आपल्या स्वनिधीतून सेवा सहकारी संस्थांना केलेल्या पीक कर्जपुरवठ्यावर १.७५ टक्के दराने व्याज सवलत देण्यात येते.

३. राष्ट्रीयीकृत बँका, खासगी बँका व ग्रामीण बँकांनी ६ टक्के व्याजदराने केलेल्या कर्जपुरवठ्यावर राज्य शासनाकडून १ टक्का व्याज परतावा संबंधित बँकांना देण्यात येतो.

**सहकार संजीवनी योजना :** ही योजना विदर्भातील अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा या ६ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील ८०२ अपात्र संस्थांचे पुररुज्जीवन करण्यासाठी राबविण्यात येते. चालू वर्षात (सन २०१२-२०१३) मागील वर्षाच्या कर्जवाटपाच्या तुलनेत केलेले वाढीव कृषि कर्जवाटपाच्या योजनेच्या २ टक्के किंवा अधिकतम रु. ५० हजार किंवा यापैकी जी रक्कम कमी असेल, ती रक्कम प्रोत्साहनपर अनुदान स्वरूपात देण्यात येते. तसेच, मागील वर्षाच्या तुलनेत चालू वर्षी केलेली वाढीव कृषि कर्ज वसुली रकमेच्या २ टक्के किंवा अधिकतम रु. ५० हजार यांपैकी जी रक्कम कमी असेल, ते प्रोत्साहनपर अनुदान देय होईल. त्याप्रमाणे संस्थेच्या सचिवाला वाढीव कृषि कर्जवाटपापोटी व जून २०११ अखेर केलेल्या वाढीव कृषि वसुलीपोटी संबंधित वर्षात मिळालेल्या एकूण अनुदानाच्या १० टक्के किंवा अधिकतम रु. १० हजार यापैकी जी रक्कम कमी असेल, ती उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात येईल.

**माहितीसाठी संपर्क :** ०२०-२६१२२८४६/४७ वि. क्र. २१७ ते २१९


आमच्या कडे सर्व प्रकारचे बि बियाणे, तसेच औषधे व सर्व प्रकारची रासायनिक खते व डिप योग्य दरात मिळतील.

**आशिर्वाद कृषी सेवा केंद्र**

**ता. वाशी, जि. उस्मामाबाद.**

**प्रो. भांडवले प्रभाकर पांडुरंग**
(बी.एस्सी ॲग्री)
मो.नं. ९४२३७१८३३५, ९४२१०९९००८, ९४२३८८६१६१.

# भारतातील सर्वात मोठे
# कृषिप्रदर्शन

## किसान
## KISAN

१६-२० डिसेंबर २०१५ - पुणे

नाव नोंदणीसाठी
९५९५ ३८९ ३८९ वर
**'S'** अक्षर SMS करा
व अधिक माहिती मिळवा.

मीडिया पार्टनर
आकाशवाणी

वेब सहयोग
KISAN.com
शेतकऱ्यांसाठी संकेतस्थळ

किसान फोरम प्रा. लि.
११७०/१७-बी, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
०२०-३०२५२००० +९१-९५९५३८९३८९
team@kisan.com

www.kisan.in

aay's 6/15

# मच्छीमार, मत्स्य व्यावसायिकांसाठी योजना

## मत्स्यबीज उत्पादन केंद्राची स्थापना

राज्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था, खासगी तलावधारक व मत्स्य कास्तकारांना शुद्ध जातिवंत मत्स्यबीज पुरवठा करण्यासाठी केंद्रात मत्स्यबीज उत्पादन करणे हा योजनेचा उद्देश आहे. विक्रीयोग्य आकाराचे मत्स्यबीज तयार झाल्यानंतर प्रचलित दराने त्याची विक्री केली जाते. या योजनेअंतर्गत मत्स्यबीज केंद्र बांधकाम खर्च व मत्स्यबीज उत्पादनासाठी आवश्यक साधनसामग्री, खते व खाद्य या बाबींचा समावेश होतो. राज्यभर ४९ शासकीय मत्स्यबीज उत्पादन केंद्रांमध्ये उत्तम जातिवंत मत्स्यबीजनिर्मितीचा कार्यक्रम राबविला जातो.

**अवरुद्ध पाण्यात मत्स्यसंवर्धन :** राज्यात नव्याने निर्माण झालेले जलाशय, पाटबंधारे तलाव, धरणे आदींमध्ये मत्स्य विभागामार्फत मत्स्यबीज संचयन करणे व उत्पादन वाढविणे, हा योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत नवीन तलावांची व नवीन संस्थांची निवड करून सर्वसाधारण विशेष घटक योजना, आदिवासी उपयोजना, आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजनांतर्गत निवडलेल्या तलावात प्रथम २ वर्षे १०० तिसऱ्या वर्षी ७५ व चौथ्या व पाचव्या वर्षी २५ इष्टतम प्रमाणात मत्स्यबोटुकली संचयन केले जाते. घटकनिहाय अनुदानाचे निकष, लाभार्थी निवडीची पात्रता या योजनेत नवीन तलाव व संस्था ७० घटकांत समावेश केला जातो. ही योजना वैयक्तित लाभार्थ्यांसाठी नाही.

**मासेमारी साधनांच्या खरेदीवर अर्थसाह्य :** मच्छीमार आर्थिक दुर्बल घटकांत मोडत असल्यामुळे मासेमारी करण्यासाठी जाळी, सूत खरेदी करावे लागते. याचा खर्च त्याला परवडत नाही. त्यामुळे शासन खरेदीवर अर्थसाह्य देते. या योजनेअंतर्गत मच्छीमार सहकारी संस्थांच्या सभासदांना प्रतिसभासद ५ किलो याप्रमाणे रु.१९८/- प्रतिकिलो या मर्यादेत नायलॉन सूत/जाळी खरेदीवर अनुदान दिले जाते. तसेच नव्याने बांधलेल्या किंवा खरेदी केलेल्या नावेवर ५० अनुदान रु. ३,०००/-च्या मर्यादेत दिले जाते.

**मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थाचा विकास :** नव्याने नोंदणीकृत मच्छीमार संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी संस्थेस शासकीय भागभांडवलाचा पुरवठा करणे, हा योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी संस्थेच्या भागभांडवलाच्या तिप्पट किंवा जास्तीत जास्त रु. १० हजारांच्या मर्यादेत शासकीय भागभांडवल देण्यात येते. त्याची परतफेड ५ वर्षांनंतर पुढील १० वर्षांत समान हप्त्यांत करावी लागते. तसेच, संस्थेचे व्यवस्थापन चालविण्यासाठी नेमलेल्या व्यवस्थापक किंवा सहायकाच्या मानधनासाठी प्रथम तीन वर्षे रु. ५०० प्रमाणे व उर्वरित चौथ्या आणि पाचव्या वर्षी प्रत्येकी रु. २५० प्रमाणे एकूण रु.२,०००/- व्यवस्थापन सहाय्य दिले जाते.

**मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणा :** सधन मत्स्यशेतीतील तंत्रज्ञानाचा प्रसार करून अधिकाधिक मत्स्योत्पादन होण्यासाठी वैयक्तिक तलावधारक मत्स्यशेती करू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांची निवड करणे, हा योजनेचा उद्देश आहे. ही केंद्र पुरस्कृत योजना प्रत्येक जिल्ह्यात राबविण्यात येते.

**मच्छीमारांसाठी घरकूल योजना :** ही योजना राष्ट्रीय कल्याण निधी या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत आहे. आदर्श मच्छीमार गावास विकास या घटकांतर्गत राज्यातील भूभाग आणि सागरी क्षेत्रातील मच्छीमारांसाठी सुरक्षित निवारा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने घरे बांधून देणे, कूपनलिका, सामूहिक उपक्रम किंवा कामांसाठी समाजमंदिर आदी सेवा या योजनेअंतर्गत पुरविण्यात येतात. दारिद्र्यरेषेखालील आणि दुर्बल घटकांतील मच्छीमारांना प्राधान्य देण्यात येते. या योजनेत केंद्र आणि राज्य सरकारांचा निम्मा-निम्मा आर्थिक सहभाग आहे. घरकूल बांधकाम : रु. ५०,००० (प्रतिघरकुल), कूपनलिका रु. ३०,००० (११ ते २० घराच्या संचास एक कूपनलिका), समाजमंदिर : रु. १,७५,००० (७५ घरांच्या सचास एक समाजमंदिर).

**अपघात गट विमा योजना :** राज्यात मासेमारी करताना विविध अपघात होतात. तसेच सर्पदंश, विंचूदंश, वाहन अपघात वा अन्य कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे मच्छीमारांचा मृत्यू ओढावतो. काहींना कायमचे अपंगत्व येते. कर्त्या व्यक्तीस अपघात झाल्यास कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचण निर्माण होते. अशा कुटुंबांसाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत मासेमारी करताना नैसर्गिक अपत्तीमुळे होणारे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव होणारे अपघाती मृत्यू, पूर्णत: किंवा कायमचे अपंगत्व आल्यास रु. १ लाखांचे व अंशतः अपंगत्व आल्यास रु. ५० हजारांचे विमा संरक्षण देण्यात येते.

**मच्छीमार युवकांना प्रशिक्षण :** मत्स्यव्यवसाय विस्तार कार्यक्रमांतर्गत कृषी विभागाच्या सहाय्याने आत्माअंतर्गत मच्छीमार युवकांना मत्स्य कास्तकारांना योग्य मानधन देऊन प्रशिक्षण देण्यात येते. तसेच, राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्डामार्फत जलाशय मत्स्यविकास कार्यक्रमांतर्गत भूजल क्षेत्रात मच्छीमार सहकारी संस्थेच्या सभासदांना जलाशयातील मत्स्यव्यवसाय विकास तसेच पेण व केजमध्ये मत्स्यबीज संवर्धनाचे प्रशिक्षण देण्यात येते.

वरील योजनांबरोबर राष्ट्रीय सहकार विकास निगमअंतर्गत एकात्मिक जलाशय विकास कार्यक्रमात संस्थेस मासळी वाहतूक व विक्री करण्याकरिता वाहन खरेदी करण्याकरिता कर्ज उपलब्ध करून दिले जाते. तसेच, राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्डामार्फत मत्स्यव्यवसाय विकास योजना अतिक्षार पड जमिनित मत्स्य/कोळंबीपालन यासारख्या महत्त्वपूर्ण योजना राबविण्यात येतात.

संपर्क : ०२०-२५६५१२२४

# पशुसंवर्धन विभाग

## राष्ट्रीय पशुधन अभियान (NLM) अंतर्गत वैरण व खादय विकास उपअभियान

केंद्रशासनाने सन २०१४-१५ या वर्षापासून राष्ट्रीय पशुधन अभियानास (NLM) प्रशासकीय मंजूरी प्रदान केली असून, या अभियानाअंतर्गत वैरण व पशुखाद्य विकास उपअभियानाचा (Submission on Fodder and Feed Development) समावेश करण्यात आलेला आहे. सदर उपअभियानात खालील १० योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१) **वनक्षेत्र नसलेल्या नापिक जमीनी/गायरान जमीनी/गवती कुरणक्षेत्र व पडिक जमीनी क्षेत्रातुन वैरण उत्पादन करणे** (Fodder production from Non-Forest wasteland/ rangeland/grassand/ non-arable land)

हलक्या/पडीक जमिनी विकसीत करुन, त्यावर योग्य प्रकारचे एकदल/व्दिदल गवत प्रजाती व वैरणदेय वनस्पती / वेरण उपयोगी वृक्ष यांची लागवड करुन, जमिनीची अतिरिक्त धूप थांबविणे, जनावराच्या पोषणसाठी वैरणीचे उत्पादन करणे, उत्पादित वैरणिचा राखीव साठा, वैरण संचयणीचे स्वरुपात जतन करणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमांतर्गत जमिनीची प्रतवारी निश्चित करुन, कृषी हवामान प्रभागानुसार योग्य, गवत प्रजातींची लागवड करणे, जेणेकरुन सदर जमिनीची धूप थांबविण्या बरोबरच सुपीकता वाढविण्यास मदत होईल.या कार्यक्रमांतर्गत एका युनीटसाठी २.५ हेक्टर एवढे क्षेत्र वैरण विकासासाठी उपयोगात आणण्यात येंते. या अंतर्गत सामाईक/ वरकस जमिनी/ गायरान/ पडीक जमिनी/ शासकीय प्रक्षेत्राच्या जमीनी/ गोशाळांच्या जमिनी/ वनक्षेत्रातील जमिनी आणि शेतक-यांच्या वैयक्तीक जमिनीवर, सदर कार्यक्रम राबविण्यात येतो. सदर कार्यक्रमांतर्गत १ हेक्टरच्या केंद्र शासनाचे १०० टक्के अर्थसहाय्य देण्यात येते . तसेच जमिनीच्या प्रभागानुसार रूपये ०.३० लक्ष ते रूपये १.०० लक्ष प्रति हेक्टर अनुदान अनुज्ञेय आहे.

२) **वैरण बियाणे प्रापण/संकलन आणि वितरण** (Fodder Seed Procurement and Distribution):

राज्यात उत्तम दर्जाचे ब्रिडर वैरण बियाणे, पायाभुत बियाणे आणि प्रमाणित बियाणे यांचे उत्पादन वाढवून उत्पादित बियाणांना खात्रीशीर बाजारपेठ उपलब्ध करुन देणे, आणि शेतक-यांना वैरण उत्पादनासाठी दर्जेदार प्रमाणित वैरण बियाणे वाटप करणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.या कार्यक्रमाकरीता शासकीय यंत्रणा/शासन अंगीकृत उपक्रमांना केंद्र शासनाचे ७५ टक्के अनुदान व राज्य शासनाचे २५ टक्के अनुदान अनुज्ञेय आहे.

३) **हस्तचलीत कडबाकुट्टी यंत्राचे वितरण** (Distribution of Hand Driven Chaff cutter):

राज्यात उत्पादित होणा-या वैरणीचा पुरेपुर वापर व्हावा व वैरण वाया जाण्याचे प्रमाण कमी व्हावे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. एका हस्तचलीत कडबाकुट्टी यंत्र खरेदीसाठी रु.५०००/- (रुपये पाच हजार फक्त) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चाच्या ७५ टक्के अथवा कडबाकुट्टी यंत्राच्या प्रत्यक्ष खरेदी किमतीच्या ७५ टक्के यापैकी जी रक्क्म कमी असेल, तेवढे केंद्र शासनाचे अनुदान या कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय आहे व उर्वरित २५ टक्के लाभार्थी हिस्सा आहे.

४) **विद्युतचलीत कडबाकुटी यंत्राद्र्म वितरण** (Distribution Power Driven Chaff cutter) :

राज्यात उत्पादीत होणा-या वैरणीचा पुरेपुर वापर व्हावा व वैरण वाया जाण्याचे प्रमाण कमी व्हावे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. एका विद्युतचलीत कडबाकुट्टी यंत्र खरेदीसाठी रु.२००००/- (रुपये वीस हजार फक्त) खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्चाच्या ५० टक्के अथवा कडबाकुटी यंत्राच्या प्रत्यक्ष खरेदी किमतीच्या ५० टक्के यापैकी जी रक्क्म कमी असेल, तेवढे केंद्र शासनाचे अनुदान या कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय आहे. व उर्वरित ५० टक्के लाभार्थी हिस्सा आहे.

५) **वैरणीच्या विटा तयार करण्याचे युनिट स्थापन करणे.** (Establishment of Fodder Block Making Unit)

पिक काढणीनंतर वाया जाणारा पिकांचे अवशेष (Crop Residues) वाया न घालवता त्याचा जनावरांसाठी वैरणीच्या विटा तयार करण्यासाठी उपयोग करणे, जनावरांसाठी टंचाई, अतिवृष्टी, पुरपरिस्थितीच्या काळात पौषणयुक्त खाद्य उपलब्ध करणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. ५० टक्के केंद्र हिस्सा व ५० टक्के लाभार्थी संस्थेचा हिस्सा असलेली योजना असून एकूण युनीट उभारणीसाठी रु.७५.०० लाख अनुदान अनुज्ञेय आहे.

६) **लघु क्षमतेचे ट्रॅक्टरला जोडता येणारे वैरणीच्या विटा तयार करण्याचे युनिट/ गवताचे गठ्ठे तयार करण्याचे मशिन/ वैरण कापणी यंत्राचे वितरण.** y Bailing Machine/ Reaper/ Forage Harvester) :

सदर योजने अंतर्गत आवश्यक यंत्र सामुग्रीच्या प्रकल्प अहवालाच्या (जमिनीची किंमत वगळता) किंमतीच्या ५० टक्के, केंद्र शासनाचे अर्थसहयाय खाजगी उद्योजकाकरिता अनुज्ञेय असुन, उर्वरीत ५० टक्के त्यांचा स्वहिस्सा राहील. खाजगी उद्याेजकासाठी केंद्र सहाय्याचे रक्कम राष्ट्रीयकृत बँकेकडून प्रकल्पाच्या छाननीवर आधारीत बॅक-एन्डेड सबसीडी स्वरूपात आहे. शासकीय व सहकारी संस्थाकरिता ७५ टक्के अर्थसहयाय

अनुज्ञेय आहे. शासकीय संस्थाकरिता उर्वरीत २५ टक्के राज्य हिस्सा व सहकारी संस्थाकरिता उर्वरीत २५ टक्के त्यांचा स्वहिस्सा राहील. केंद्र शासनाचे अनुदानाची कमाल मर्यादा रू. १०.०० लक्ष आहे.

७) **मुरघास तयार करण्याच्या युनीटची स्थापना करणेसाठी अर्थसहाय्य** (Assistance for Establishment of Silage making Units) :

अतिरिक्त उत्पादित हिरव्या वैरणीचे मुरघास तयार करुन, त्याचा चारा टंचाईच्या काळात गुरांना पोषणमूल्य युक्त वैरण उपलब्ध करुन देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमांतर्गत मुरघास तयार करण्यासाठी क्षमतेनुसार रु. ५००००/- ते १०००००/- अनुदान अनुज्ञेय आहे. सदर योजनांतर्गत उपलध असलेल्या अनुदानाची कमाल मर्यादा एकुण खर्चाच्या ७५ टक्के असून उर्वरीत २५ टक्के हिस्सा लाभाथ्यानि स्वत: खर्च करावयाचा आहे.

८) **बायपास प्रोटीन उत्पादन केंद्रांच्या स्थापनेकरीता अर्थसहाय्य** (Assistance for Establishment of By-Pass Protein Production Units):

उच्च दूध उत्पादन करणा-या दुधाळ गायी म्हशींच्या पोषणासाठी उत्तम दर्जाचे खाद्य घटक वापरुन या खाद्याचे पोषणमूल्य वाढविण्याबरोबरच ते गुरांच्या आहरासाठी पुरेपुर उपयोगात आणणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमांतर्गत दूध महासंघ, खाजगी उद्योजक यांना प्रती दिन ५० मेट्रीक टन उत्पादन क्षमतेचे, बायपास प्रोटीन उत्पादन केंद्राची स्थापना करण्यासाठी केंद्र शासनाचे अर्थसहाय्य अनुदेय आहे. सदर युनीटची स्थापना करण्यासाठी लागणारी संयंत्रे व यंत्रसामुग्री यांच्या खरेदीसाठी रु. २००.०० लक्ष अनुदान अनुज्ञेय आहे. शासकीय, निमशासकीय व सहकारी संस्था याकरीता अनुदानाची कमाल मर्यादा एकुण प्रकल्प खर्चाच्या ७५ टक्के व खाजगी उद्योजकाकरीता २५ टक्के आहे. संस्था/उद्योजकाला प्रकल्प उभारणीसाठीचा उर्वरित खर्च बँकेच्या कर्जाव्दारे उपलब्ध करावा लागेल. या कार्यक्रमाखाली संस्था/उद्योजकांचे राष्ट्रीयकृत/व्यापारी बँक/नाबार्ड यांचेकडून प्रकल्पाच्या आर्थिक व्यवहार्यतेबाबत आणि वर्धनक्षमतेबाबत प्रमाणित केलेले प्रस्ताव विचारात घेतले जातात.

९) **क्षेत्रनिहाय विवक्षित भागात क्षार मिश्रण : पशुखाद्य कांडी व पशुखाद्य निर्मीती केंद्राच्या स्थापनेकरीता अर्थसहाय्य** (Assistance for Establishment of Area specific Mineral Mixture/Feed Pelleting/Feed Manufacturing Unit) :

पशुखाद्य व विवक्षित भागातील क्षारांच्या कमतरतेनुसार, त्या भागात आवश्यक घटक द्रव्यांसह क्षार मिश्रणाची उपलब्धता वाढवून त्याव्दारे पशुधनाच्या आरोग्यात सुधारणा व उत्पादन क्षमतेत वाढ करणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमाखाली, सार्वजनिक उपक्रम, खाजगी उद्योजक यांना



क्षार मिश्रण, पशुखाद्य कांडी व पशुखाद्य निर्मीती केंद्राच्या स्थापनेकरीता अर्थसहाय्य देय आहे. सदर युनीटची स्थापना करण्यासाठी लागणारी संयंत्रे व यंत्रसामुग्री यांच्या खरेदीसाठी रु. २००.०० लक्ष अनुदान अनुज्ञेय आहे. शासकीय, निमशासकीय व सहकारी संस्था याकरीता अनुदानाची कमाल मर्यादा एकुण प्रकल्प खर्चाच्या ७५ टक्के व खाजगी उद्योजकाकरीता २५ टक्के आहे. संस्था/उद्योजकाला प्रकल्प उभारणीसाठीचा उर्वरित खर्च बँकेच्या कर्जाव्दारे उपलब्ध करावा लागेल. या कार्यक्रमाखाली संस्था/उद्योजकांचे राष्ट्रीयकृत/व्यापारी बँक/नाबार्ड यांचेकडून प्रकल्पाच्या आर्थिक व्यवहार्यतेबाबत आणि वर्धनक्षमतेबाबत प्रमाणित केलेले प्रस्ताव विचारात घेतले जातात.

१०) **पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळेची स्थापना व आधुनिकिकरण** (Establishment & Modernization of Animal Feed Analysis Lab):

राज्यात पशु व कुक्कुट खाद्याचा तसेच या खाद्याच्या निर्मीतीसाठी लागणा-या खाद्य घटकांचा दर्जा, विहित मानकांनुसार व उच्च प्रतीचा राखण्यासाठी, उच्च दर्जाचे खाद्य उत्पादन वाढविणे व उपलब्ध करुन देणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्यातील पशुसंवर्धन विभागाची खाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, तसेच महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांचे अधिनस्त कार्यरत असलेल्या पशुवैद्यकीय महाविद्यालयातील खाद्य विश्लेषण प्रयोगशाळा तसेच कृषी विद्यापीठांतर्गत कार्यरत खाद्य विश्लेषण प्रयोगशाळांमध्ये, खाद्य नमुन्यांचे पृथ:करण करणेसाठी आवश्यक असलेली आधुनिक यंत्रसामुग्री व उपकरणे खरेदी करण्या साठी अनुदान उपलब्ध करण्यात येत. याकरीता केंद्र शासनाचे ७५ टक्के अनुदान अनुज्ञेय असून उर्वरीत २५ टक्के खर्च संबंधित यंत्रणेद्वारे करणे अपेक्षित आहे. एका खाद्य विश्लेषण प्रयोगशाळेकरीता केंद्र शासनाच्या अनुदानाची अनुज्ञेय कमाल मर्यादा रुपये २००.०० लक्ष (रुपये दोनशे लक्ष) आहे.

वरील योजनांच्या लाभासाठी नजिकच्या पशुवैदयकिय दवाखाना/ पशुधन विकास अधिकारी, (विस्तार) पंचायत समिती कार्यालय/जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, यांचेशी संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीकरीता विभागाचा टोल फ्री दुरध्वनी क्र.१८००२३३०४१८ या क्रमांकावर संपर्क करावा.

# विविध प्रकारची गुणवत्तावर्धक खते



## हरितक्रांतीसाठी

आरसीएफ च्या खत उत्पादन व विपणन कार्यात भारतीय शेतक-यांचा सहभाग अर्थपूर्ण व महत्त्वाचा आहे हे निर्विवाद सत्य आहे. म्हणूनच कंपनीचा दृष्टीकोन ग्राहकाभिमुख विशेषत: शेतकरी विकासास पोषक बनला आहे.

संपूर्ण देशातील शेतक-यांच्या विविध गरजांची पूर्तता कंपनीची विविध खते त्यांच्या शेतावर पोचल्यानेच होईल हे समजून ग्राहक संतोष हेच आमचे ध्येय बनले आहे. सुजला, बायोला व माइक्रोला याशिवाय संथ गतीने पिकांना मिळणारे व कडुनिंबाचे आवरण असलेले उज्ज्वला यूरिया, बोरोनमिश्रित सुफला ही खते झपाट्याने शेतक-यांत प्रिय होत आहेत. संपूर्ण भारतात आरसीएफ निर्मित सुफला व उज्ज्वला यूरिया ही खते तर गेल्या चाळीस वर्षांपासून घरोघरी माहित झाली आहेत.

देशभरातल्या शेतक-यांना सक्षम व समृध्द करण्यासाठी हातभार लाभावा म्हणून कंपनीतर्फे प्रशिक्षण / शिक्षण कार्यक्रम, माती परीक्षणासाठी विविध ठिकाणी सोय, प्रात्यक्षिकाद्वारे उत्तम शेतीचे धडे इ. वर्षभर केले जाते. तसेच शेतक-यांच्या सूचनांचा आदर करुन क्षमतेनुसार गरजांची पूर्तता करण्याचा प्रयत्नही केला जातो.

शेतकरी मित्रांनो, आरसीएफ सर्वांगीण उन्नतीसाठी उत्तुंग झेप घेत असताना भारतीय शेतक-यांच्या सक्रीय सहभागाबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत आहे.



**राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लि.**

(भारत सरकारचा उपक्रम)

समृध्दिची एकत्र वाटचाल

प्रियदर्शिनी, इस्टर्न एक्सप्रेस हायवे, मुंबई ४०० ०२२.

C RM, RCF

# महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प (MACP)

शेतकऱ्यांच्या उत्पादकतेत पर्यायाने उत्पादनात वाढ करणे, तसेच शेतकऱ्यांना पर्यायी बाजार सुविधा उपलब्ध करुन शेती मधून आधुनिक तंत्रज्ञानाबरोबरच विक्री व्यवस्थापन बळकट करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प जागतिक बँकेच्या अर्थ सहाय्याने माहे डिसेंबर – २०१० पासून राज्यात टप्पा टप्याने राबविण्यात येत आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी कृषि, पणन व पशुसंवर्धन या तीन विभागांमार्फत करण्यात येते. महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प राज्यात खालील प्रमाणे तीन टप्यात विविध जिल्ह्यात कार्यान्वित करण्यात आला आहे.

**पहिला टप्पा** :

(सन २०११–१२) अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ

**दुसरा टप्पा** :

(सन २०१२–१३) नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, लातुर, नांदेड, बीड, उस्मानाबाद, सोलापूर

**तिसरा टप्पा** :

(सन २०१३–१४) नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे.

कृषि उत्पन्न बाजार समिती, आठवडी बाजार, जनावरे बाजार आणि वखार महामंडळाचे गोदाम हे कार्यक्षेत्र ठरवून कृषि उत्पन्न बाजार समिती – १००, आठवडी बाजार – ३५०, जनावरे बाजार – २४ मध्ये या प्रकल्पाचे कार्यक्षेत्र आहे.

प्रकल्पांतर्गत शेतकरी गटाच्या सहाय्याने आत्मा संस्थेमार्फत बाजाराभिमुख विस्तार विषयक (Market Lead Extension) बाबी राबवितांना खालील घटकांचा समावेश करणेत आला आहे.

१) जिल्ह्यांच्या आत्मा संस्थेचे बळकटीकरण.

२) जिल्ह्याचा कृषि पणन आराखडा (MSS) तयार करणे.

३) प्रत्येक जिल्ह्यातून दोन याप्रमाणे ६६ शेतकरी सल्ला व माहिती केंद्र (FIAC) चे बळकटीकरण.

४) सेवा संस्थेच्या मदतीने शेतकरी गटांची स्थापना करणे.

५) प्रकल्पांतर्गत निवडण्यात आलेल्या बाजार समिती (APMC) व आठवडी बाजार (RH), वखार महामंडळाची गोदामे इ. कार्यक्षेत्रामध्ये सामुहीक पध्दतीने शेतकरी प्रशिक्षण, पिक प्रात्यक्षिके, शेतकरी अभ्यास दौरे, काढणी पश्चात तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, खरेदीदार–विक्रेत्यांची संम्मेलने, नाविन्यपूर्ण प्रायोगिक प्रकल्प इ.

६) प्रकल्पांतर्गत स्थापना करण्यात आलेल्या शेतकरी गटांना एकत्र करुन शेतकरी उत्पादक कंपन्या (FPO) स्थापन करणे. महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत, प्रत्येक जिल्ह्यामध्ये ज्या ठिकाणी विक्रीयोग्य शेतीमाल (Marketable Surplus) आहे, असे १५ क्लस्टर निवडलेले आहेत. या क्लस्टर मध्ये शेतकऱ्यांना एकत्रीत करून त्यांचे शेतकरी उत्पादक गट तयार करणे, तसेच त्यांची बांधणी करून गटांचे बळकटीकरण करणे व त्यांना बाजाराशी निगडीत प्रशिक्षण आयोजित करणे व एकत्रीत आल्यानंतर काय फायदे होतात याचे त्यांचेकडून प्रात्यक्षिक करून घेणे. १५ ते २० शेतकरी गट एकत्रीत करून शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना करणे.

७) कंपनी कायदा २०१३ अन्वये, स्थापन झालेल्या शेतकरी उत्पादक कंपनीचा पुढील ३ ते ५ वर्षाच व्यवसाय आराखडा (Business Plan) तयार करणे व व्यवसाय आराखड्याप्रमाणे एमएसीपी प्रकल्पा शिवाय इतर योजनांचे एकत्रीकरण करून कंपनी फायद्यामध्ये कशी चालेल या बाबत मार्गदर्शन करून, ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांना पर्यायी बाजार व्यवस्था निर्माण करणे.

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला जास्तीत जास्त बाजार भाव मिळण्यासाठी गुणवत्ता पूर्ण मालाचे उत्पन्न करुन उत्पादीत मालाची स्वच्छता, प्रतवारी व मुल्यवर्धन या विषयी शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठी प्रकल्पांतर्गत सेवा पुरवठादार संस्थेच्या मदतीने राज्यात तिन्ही टप्प्यात मिळून एकुण ९१४२ शेतकरी गट स्थापन करण्यात आले आहेत. या स्थापन करण्यात आलेल्या गटामधून १५ ते २० गट एकत्रित येऊन शेतकरी उत्पादकांची कंपनी कायदा २०१३ अंतर्गत कंपनी स्थापन करुन शेतकरी सामुहिक सेवा केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पर्यायी बाजार उपलब्ध ह्यावा या उद्देशाने शेतकरी सामुहिक सेवा केंद्रास प्रकल्पांमार्फत रुपये ७.५ लाख अर्थसहाय्य देण्यात येईल. (शेतकरी उत्पादक कंपनीचा स्वहिस्सा रुपये २.५ लाख) या शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत उत्पादित शेती मालाचे एकत्रिकरण करुन शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत त्याची विक्री करुन शेतकऱ्यांना पर्यायी बाजार उपलब्ध होणार आहे. यानुसार प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान १४ शेतकरी उत्पादक कंपन्यांचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. आज अखेर १६५ शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली असून, ११० शेतकरी उत्पादक कंपन्यांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यांत आले आहे. यासाठी रु. ५८५ लाख अनुदान प्रकल्पामार्फत मंजूर झालेले आहे व २७ शेतकरी उत्पादक कंपन्यांची प्रत्यक्ष उलाढाल सुरू आहे. या अनुषंगाने आतापर्यंत ७८ उत्पादक कंपन्यांना अर्थसहाय्यासाठी मान्यता दिली आहे. तसेच उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचे काम प्रगती पथावर आहे.

प्रकल्पांतर्गत कृषि उद्योजकता विकास कार्यक्रमातंर्गत शेतकरी उत्पादक गटांना जास्तीत जास्त रु. १० लाख अर्थसहाय्य देण्यात येईल. (एकुण प्रकल्पाच्या ५० टक्के) यानुसार प्रत्येक जिल्ह्यांमध्ये किमान २ प्रकल्पांना अर्थसहाय्य देण्यात येईल. माहे मे २०१५ अखेर ४ प्रकल्प प्रस्तावांना मंजुरी दिलेली असून सदर प्रकल्प कार्यान्वीत झालेले आहेत.

संपर्क : ०२०–२४२७०३१५

# सामाजिक वनीकरण विभागाच्या योजना

महाराष्ट्रात सुमारे ४९ लाख हेक्टर पडीक जमिनी आहे. सामाजिक वनीकरण कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे ही वनेत्तर पडीक जमीन लोकांच्या सक्रिय सहाय्याने व सहकार्याने उत्पादनशील बनविणे, तसेच वनक्षेत्रांवर ताण कमी करणे. यासाठी खासगी व सामूहिक पडीक जमिनीवर, शेती बांधावर, पडीक जमीन पट्ट्यावर, रस्ता कालवा व रेल्वे मार्गाच्या दुतर्फा, औद्योगिक, शैक्षणिक व सामाजिक संस्थांच्या आवारात, इत्यादी ठिकाणी वृक्षारोपणाचा भरभक्कम कार्यक्रम राबवून सामाजिक वनीकरणाचे काम हाती घेणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्रातील सामाजिक वनीकरणाची मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे...**

निवडलेल्या पाणवहाळ क्षेत्रातील सामूहिक व खाजगी जमिनींवर लोकांच्या सक्रिय सहभागाने तसेच ग्रामीण क्षेत्रातील पडीक व मोकळया जमिनींवर वृक्षारोपणाच्या मोठया प्रमाणावरील कार्यक्रमाद्वारे इंधनासाठी लाकूड, वैरण, फळे इत्यादीद्वारे उत्पन्नात वाढ करणे. ग्रामीण रोजगाराची व्याप्ती वाढविणे, पर्यावरण संतुलनाची पुनर्स्थापना करणे व सर्वसाधारणपणे ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानाच्या दर्जात सुधारणा करणे.

**१. मनुष्यबळ विकास व तंत्रज्ञानाचा प्रसार लोक जागृती, प्रसिद्धी, प्रचार व प्रसार कार्यक्रम :**

सामाजिक वनीकरण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या निरनिराळ्या योजनांची जनतेस माहिती व्हावी. वृक्ष लागवड, वृक्षसंवर्धन, पर्यावरण रक्षण, प्रदूषण नियंत्रण याबाबत त्यांच्यामध्ये जागृती निर्माण होऊन त्यांनी त्यांच्या खाजगी, पडीक क्षेत्रात जास्तीत जास्त प्रमाणात वृक्षांची लागवड करावी या दृष्टिकोनातून सामाजिक वनीकरण विभागामार्फत प्रचार, प्रसार व प्रसिद्धी. या कार्यक्रमांतर्गत जिल्हा स्तरावर, राज्य स्तरावर महाविद्यालयीन, माध्यमिक व प्राथमिक अशा तीन गटांत निबंध, चित्रकला, छायाचित्र तसेच वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करून अशा स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांत, जनतेत वृक्ष लागवडीमध्ये सहभाग वाढविण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करण्यात येतात. घडीपत्रिका, भित्तिपत्रके,. स्टिकर्स, दिनदर्शिका, यशोगाथा, वनश्री पुरस्काराबाबत वृत्तपत्रांद्वारे माहिती व प्रसिद्धी.

**प्रशिक्षण** : सामाजिक वनीकरण विभागाचे राजगुरुनगर येथे प्रशिक्षण केंद्र असून वन विभागाची शहापूर, पाल, चिखलदरा, चंद्रपूर येथे प्रशिक्षण





केंद्रे असून अशा प्रशिक्षण केंद्रांतूनही सामाजिक वनीकरण विभागाच्या कर्मचाऱ्यांना / स्वयंसेवी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना / ग्रामस्थांना कृषी वानिकीच्या निरनिराळ्या नमुन्यांची, रोपवाटिकेच्या आधुनिक तंत्रज्ञानाची, क्षारपड जमिनीच्या विकासासाठी हाती घ्यावयाच्या कामांचे प्रशिक्षण देण्याचे प्रस्तावित आहे.

### २. किसान रोपवाटिका

रोपवाटिकांचे विकेंद्रीकरण व ग्रामस्थांना रोपवाटिकेचे तंत्रज्ञान अवगत करून देऊन लाभार्थी मार्फत रोपे तयार करण्याच्या दृष्टीने किसान रोपवाटिका योजना अस्तित्वात आली. तद्वतच या योजनेचा हेतुपूरक रोजगारनिर्मिती करणे व त्याद्वारे लाभार्थींची आर्थिक पातळी उंचाविणे हा आहे. जनतेचा किसान रोपवाटिका या योजनेस मिळणारा वाढता प्रतिसाद पाहता सदरची योजना अधिक लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने अशासकीय संस्थांनाही यात सहभागी करून घेण्यात येत आहे.

### ३. वनीकरणाद्वारे सागरी किनारपट्टीचे संरक्षण

पश्चिम किनारपट्टीवरील उपलब्ध भूखंडावर मॅनग्रोव्ह व सुरू प्रजातीची रोपवने केल्याने किनारपट्टीच्या जमिनीची पाण्यापासून तसेच वाऱ्यापासून होणारी धूप थांबेल. तद्वतच त्सुनामीसारख्या आपत्तीपासून दिलासा मिळेल. याच सोबत किनारपट्टीच्या क्षेत्रामधील होणारा पर्यावरणीय ऱ्हास कमी करण्यासही मदत होईल

### ४. शासकीय रोपवाटिकेचे बळकटीकरण व आधुनिकीकरण

या योजनेंतर्गत प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून मिस्ट चेंबर्सची स्थापना करणे, दर्जेदार व उंच रोपांची निर्मिती करणे ही कामे प्रस्तावित आहेत. निरनिराळ्या योजनांतर्गत लागवडीसाठी आवश्यक रोपांची गरज भागविण्यासाठी खात्यामार्फत ३३ जिल्हयात मध्यवर्ती रोपवाटिका स्थापन करण्यात आलेल्या आहेत. या योजनेअंतर्गत मध्यवर्ती रोपवाटिका मध्ये तांत्रिक सुधारणा करण्यासाठी नवीन तंत्रज्ञाना संबंधित साधन सामुग्री उपलब्ध करून घेणे व त्याद्वारे विविध प्रजातींच्या दर्जेदार व उंच रोपांची निर्मिती करण्यासाठी कामे प्रस्तावित आहेत.

### ५. वनेतर सामूहिक जमिनीवर वृक्ष लागवड

राज्यात मोठया प्रमाणात वनेत्तर सामुदायिक जमीन आहे. सदर जमीन वृक्ष लागवडीच्या माध्यमातून उत्पादनक्षम करणे आवश्यक आहे. पाणवहाळ क्षेत्रातील वनेत्तर सामुदायिक जमिनीवर वृक्ष लागवड या योजने अंतर्गत ११ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविण्यात आला. १२ व्या पंचवार्षिक योजना कालावधीत सुध्दा हा कार्यक्रम पुढे सुरू ठेवण्यात आला असून अकराव्या पंचवार्षिक योजनेत सुधारीत स्वरूपात प्रस्तावित करण्यात येत आहे.

### राज्य पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन व नियोजन प्राधिकरण (स्टेट कॅम्पा)

सदर योजना सामाजिक वनीकरण विभागात सन २०११-१२ मध्ये सुरू झाली. त्यामध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे कामे समाविष्ट करण्यात आली होती.

१. मध्यवर्ती रोपवाटिकांचे बळकटीकरण व २ ते५ वर्षे कालावधीची नवीन रोपे निर्मिती
२. अ) कालवा दुतर्फा वृक्ष लागवड( विशेषकरून गाळ जमा होण्यास संवेदनशील कामास प्राधान्य देऊन)
   ब) रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड
३. संरचना निर्मिती, ऑनलाइन मॉनिटरींग करिता सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, जीपीएस खरेदी कन्सल्टन्सी इ.
४. प्रसिद्धी व विस्तार
५. अ) अशासकीय वनजमिनीचे तांत्रिक व्यवस्थापन करण्याकरिता कार्ययोजना तयार करणे
   ब) भारतीय वनअधिनियम १९२७अंतर्गत कलम २८ खाली गठीत ग्रामवनांच्या व्यवस्थापनाकरिता कार्ययोजना तयार करणे.

### महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रा. रोहयो अंतर्गत कामे.

राज्यात ही योजना खालील तीन टप्प्यांमध्ये लागू करण्यात आलेली असून तिसऱ्या टप्याअखेर ही योजना संपूर्ण राज्यामध्ये राबविण्यात येत आहे.

**पहिला टप्पा –** १२ जिल्हे – धुळे, नंदुरबार, अहमदनगर, औरंगाबाद, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, अमरावती, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली

**दुसरा टप्पा –** ६ जिल्हे – उस्मानाबाद, अकोला, बुलडाणा, वाशिम, वर्धा व ठाणे

**तिसरा टप्पा –** उर्वरित १५ जिल्हे – बीड, जालना, लातूर, परभणी, नाशिक, जळगाव, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग.


M.A.I.D.C.
महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)
कृषिउद्योग उत्पादनांची मिळता साथ, शेतकऱ्याची होईल भरभराट!
कृषिउद्योग खते
कृषिउद्योग जंतुनाशके
सुग्रास पशुखाद्ये
कृषिव्हेटर
आमची लोकप्रिय असलेली दर्जेदार व स्वादिष्ट नोगा उत्पादने
NOGA
प्रशासकीय कार्यालय:
कृषिउद्योग भवन, आरे दुग्ध वसाहत,
गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०० ०६५.
दूरध्वनी: ९१-२२-२९२७ २०२७/२८/२९/३१/३२
फॅक्स: ९१-२२-२८७१ ९३९९
ईमेल: headoffice@maidcmumbai.com
वेबसाईट: www.maidcmumbai.com

# रेशीम शेती उद्योग विकास

रेशीम उद्योगाच्या माध्यमातून स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे, हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांना आपल्या जमिनीत तुती लागवड करून रेशीम शेती करण्यास प्रवृत्त करण्यात येते.यासाठी तांत्रिक मार्गदर्शन केले जाते. शेतकऱ्यांकडील कोष खरेदी केले जातात. तसेच, उपलब्ध योजनांचा शेतकऱ्यांना लाभ मिळवून दिला जातो. लाभार्थ्यांच्या स्वतःच्या नावावर अर्धा एकरापासून पुढे निचरा होणारी होणारी जमीन असावी. जमिनीला पाणी देण्याची सोय असली पाहिजे. ही योजना पुणे, सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, अहमदनगर, नाशिक, ठाणे, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, वाशीम, अकोला, वर्धा, नागपूर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, बीड, नंदुरबार, धुळे व जळगाव या जिल्ह्यांत राबविली जाते.

**योजना संपर्क :** प्रत्येक जिल्ह्यातील रेशीम विकास जिल्हा रेशीम कार्यालय.

**दूरध्वनी :** ०२०/२५८१५३०८, ०२०/२५८१४४८३



# जुलैतील शेतीची कामे

जुलै महिन्याच्या सुरवातीस खरीप पिकांची राहिलेली पेरणी करून घ्यावी. त्याचबरोबर खरिपात पेरणी केलेल्या पिकांची वेळेवर विरळणी, निंदणी व डवरणी करण्यासोबत एकीकृत कीड व्यवस्थापन करावे.

- खरीप पिकांची पेरणी समतल रेषेला समांतर किंवा मुख्य उताराला आडवी करावी. ७ जुलैनंतर कपाशी, ज्वारी, मूग, उडीद या पिकांऐवजी सोयाबीन, तूर, सूर्यफूल, मका, बाजरी, एरंडी या पिकांची पेरणी करावी. १५ जुलैनंतर सोयाबीन पीक घेऊ नये. अमेरिकन तसेच देशी कपाशीचे लवकर पक्व होणारे वाण वापरावे. साधारणतः २० टक्के बियाणे जास्त वापरावे. संकरित ज्वारीचा सीएसएच-९ किंवा सीएसएच- १४ हा वाण वापरावा.
- पेरणीपूर्वी बियाण्यास ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम + पीएसबी २५ ग्रॅम + जिवाणुसंवर्धन २५ ग्रॅम (कपाशी व ज्वारी यांना ॲझेटोबॅक्टर व सोयाबीनच्या बियाण्यास रायझोबियम) प्रति किलो प्रमाणे बीजप्रक्रिया करून, बियाणे सावलीत वाळवून पेरणी करावी.
- खरीप पिके रोपावस्थेत असताना खंड पडल्यास डवरणी करून जमीन भुसभुशीत ठेवावी.
- सलग पिकाऐवजी सोयाबीन + तूर २:१ किंवा ४:२ ओळी या आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा.
- धानबांधीत चिखलणी करताना हेक्टरी ५० किलो प्रत्येकी नत्र, स्फुरद व पालाश द्यावे. (हेक्टरी युरिया ब्रिकेट्स ७० किलो- डीएपी ब्रिकेट्स १०० किलो द्यावे. गादीवाफ्यावर (नर्सरीत) तयार केलेली धानाची २१ ते २५ दिवसांची रोपे २० × १५ सेंमी. अंतरावर प्रत्येक चुडात २ ते ३ रोपे लावावीत.
- धान लावणीनंतर रोपांची मुळे चांगली रुजेपर्यंत बांधीत पाण्याची एक इंच पातळी ठेवावी.
- पावसाचे पाणी जागेवरच (मूलस्थानी) मुरविले, तर मातीची धूप कमी होते. तसेच, पावसाच्या पाण्याच्या निचऱ्याकरिता खरीप पिकांच्या पेरणीनंतर ३० दिवसांनी डवऱ्याच्या जानुकळास नारळी दोरी बांधून दर दोन ओळींनंतर सरी काढावी. जादा पाणी शेताच्या उताराच्या शेवटी शेततळ्यात गोळा करावे.
- आंब्याच्या केशर, दशहरी, आम्रपाली, पायरी, लंगडा जातींच्या तयार कलमांची ८ × ८ किंवा १० × १० मीटर अंतरावर १ × १ × १ मीटरचे खड्डे करून लागवड करावी.
- बरसई केळीची ५ × ५ फूट किंवा ठिबक सिंचन व्यवस्थेत ६ × ३ × ५ फूट जोडओळ पद्धतीने लागवड करावी. तलवारीच्या पात्याप्रमाणे पाने असलेले २ ते ३ महिन्यांचे निरोगी मुनवे निवडावेत.
- बागायती फळपिके- संत्रा, मोसंबी, चिकू तसेच कोरडवाहू फळपिके- पेरू, सीताफळ, चिंच, जांभूळ, आवळा यांची लागवड करावी.
- गॅलार्डिया, झेंडू, शेवंती, मोगरा, ग्लॅडिओलस या फुलझाडांची लागवड करावी.
- मिरची, टोमॅटो, वांगी, फुलकोबी या खरीप भाजीपाला पिकांची ४ ते ६ आठवडे वयाच्या रोपांची लागवड करावी.

# कृषि विज्ञान केंद्र, जळगाव जामोद

**अनिल गाभणे**
कृषि विज्ञान केंद्र, जळगाव जामोद
जि. बुलढाणा

सातपुडा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत जळगाव जामोद (जि. बुलडाणा) येथे जून १९९५ रोजी कृषि विज्ञान केंद्र सुरू झाले. केंद्राच्या कार्यक्षेत्रात संपूर्ण बुलडाणा जिल्हा असून, केंद्रात कृषि विस्तार, कृषि विद्या, फळबाग शास्त्र, पशुसंवर्धन, पीक संरक्षण, कृषि अभियांत्रिकी, गृहविज्ञान व संगणक या विषयांचे प्रशिक्षण, प्रात्यक्षिके व विस्ताराचे कार्य केले जाते.

## ध्येय :

१) राज्यातील कृषि विद्यापीठे/प्रादेशिक संशोधन केंद्रातील विषय विशेषज्ञ यांच्या समन्वयाने शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर गरजेवर आधारित प्रथम रेषीय प्रात्यक्षिक, प्रक्षेत्र चाचणी राबवून त्याची पडताळणी व सुधारणा करून या तंत्रज्ञानाचा अहवाल तयार करून याचा उपयोग प्रदेशानुरूप चिरकाळ टिकणारी पीक पद्धती विकसित करणे.

२) 'काम करीत शिका' या तत्त्वावर भर देऊन संस्थात्मक अर्थसहाय्याच्या मदतीने स्वयंरोजगार निर्मिती करण्यासाठी ग्रामीण युवकांसाठी कृषि व संलग्न विषयावरील दीर्घकालीन व्यावसायिक प्रशिक्षणाचे आयोजन करणे. उत्पादन व प्रतिक्रिया माहितीकरिता प्रथम रेषीय प्रात्यक्षिकाचे आयोजन करणे.

३) विस्तार अधिकारी व कर्मचारी यांना कृषि क्षेत्रातील उदयास येणारे नवीन प्रगत तंत्रज्ञान अवगत करून देण्याकरिता प्रशिक्षणाचे आयोजन करणे.

## राबविलेले कार्यक्रम

**१) प्रशिक्षण :** कृषि विज्ञान केंद्रामार्फत शेतकऱ्यांच्या गरजा व अडचणी यांवर त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून निरनिराळ्या प्रकारचे प्रशिक्षण दर वर्षी आयोजीत करण्यात येतात. ही प्रशिक्षणे ग्रामीण शेतकरी, महिला, युवक-युवती तसेच कृषि विस्तार कार्यकर्ते यांच्यासाठी कृषि विज्ञान केंद्रावर व गावपातळीवर आयोजित करण्यात येतात. केंद्रामार्फत एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ या कालावधीमध्ये ११५ प्रशिक्षणांतर्गत ३०१६७ प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले. कौशल्य आधारित रोजगार निर्मिती होण्याच्या दृष्टीने ग्रामीण युवक व युवतींसाठी व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येते. कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय, रोपवाटिका व्यवस्थापन, सेंद्रिय खते निर्मिती, फळप्रक्रिया, शिवणकला इ. विषयांवर आत्तापर्यंत ६५० ग्रामीण युवक व युवतींना प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्याअंतर्गत कुक्कुटपालन २५ युनिट, शेळीपालन १५, दुग्धव्यवसाय १० व शिवणकला २५ युनिट कार्यरत असून, त्यांनी स्वयंरोजगार निर्माण केलेला आहे.

**२. चाचणी प्रयोग व पीक प्रात्यक्षिके :** कृषि विद्यापीठातील प्रगत तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीने केंद्रामार्फत दरवर्षी शेतकऱ्यांच्या गरजेवर आधारित प्रथम रेषीय प्रात्यक्षिकाचे आयोजन शेतकऱ्यांच्या शेतावर करण्यात येते. केंद्रांतर्गत मागील ५ वर्षांमध्ये ८९ प्रथम रेषीय पीक प्रात्यक्षिके घेण्यात आली असून त्यांत प्रामुख्याने कापूस, सोयाबीन, तूर, मूग, उडीद, मका, कांदा, टोमॅटो, केळी, संत्रा, हरभरा, गहू, विविध कृषि अवजारे, कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय, महिला आरोग्य, बालक आहार व महिला श्रम कमी करण्याची प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली आहेत.

**३. इतर कृषि विस्तार कार्यक्रम :** कृषि क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञान





**शेतकरी, ग्रामीण यवक-युवती व विस्तार अधिकारी यांना प्रशिक्षण देताना कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ.**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्याच्या दृष्टीने केंद्रामार्फत दरवर्षी शेतकरी मेळावा, जिल्हास्तरीय कृषि प्रदर्शन, कृषि तंत्रज्ञान सप्ताह, शेतकरी सहल, कृविके प्रक्षेत्र भेट, पीक दिवस, शिवार फेरी, निदान भेटी, पशू आरोग्य व लसीकरण शिबिर इ. विस्तार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच प्रसिद्ध लेख, वर्तमानपत्र बातम्या, विविध घडीपत्रिका प्रकाशन, रेडिओ व टीव्हीद्वारे विविध तंत्रज्ञानाचे प्रसारण करण्यात येते.



## केंद्राचे प्रमुख कार्य :

१. **एकात्मिक कीड व्यवस्थापन :** कापूस पिकावरील कीड व रोग व्यवस्थापनाच्या दृष्टीने एकात्मिक कीड व्यवस्थापन या तंत्रज्ञानाचा प्रसार केंद्राद्वारे मागील १५ वर्षांपासून जिल्ह्यामध्ये करण्यात येत आहे. त्याअंतर्गत आत्तापर्यंत ५०० हेक्टर प्रक्षेत्रावर वरील तंत्रज्ञान प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मित्र व शत्रू कीड ओळख जागृती निर्माण झाली असून पीक संरक्षण खर्चात बचत झाली आहे. या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे २० ते २५ टक्के उत्पादनात वाढ झाल्याचे आढळून आले आहे.

२. **सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन :** केंद्रामार्फत सेंद्रिय शेती प्रचार व प्रसार करण्याकरिता विविध उपक्रम राबविले जातात. यासाठी केंद्राने मागील तीन वर्षांपासून केंद्राच्या २ हेक्टर प्रक्षेत्रावर आदर्श सेंद्रिय शेती नमुना उभारला आहे. यामध्ये पिकांच्या विविध पीक पद्धती त्रिस्तरीय आंतरपीक पद्धती, मिश्रपीक पद्धती, हिरवळीचे पिके, जिवाणू, कंपोस्ट खतांचा वापर, जीवामृत, धनामृत, बीजामृत, गांडूळपाणी इ. चा वापर करण्यात येतो. तसेच केंद्राकडे कंपोस्ट, गांडूळ व कुक्कुटपालन युनिट असून त्याचा वापर सेंद्रिय शेती व प्रशिक्षणाकरिता करण्यात येतो.

३. **कोरडवाहू सीताफळ लागवड :** केंद्राने मागील १५ वर्षांपासून जिल्ह्यामध्ये कोरडवाहू सीताफळ लागवडीसाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती होण्याच्या दृष्टीने विविध प्रशिक्षण, प्रात्यक्षिके, विस्तार, सीताफळ महोत्सव, राज्यस्तरीय सीताफळ परिषद इ. हाती घेण्यात आले आहेत. मागील १० वर्षांपासून सीताफळ रोपवाटिका तयार करण्यात आली असून, त्याअंतर्गत जिल्ह्यामध्ये २ लाख रोपे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहेत. यामुळे जिल्ह्यात सीताफळ लागवड १६४ हेक्टरवरून ९२५ हेक्टरपर्यंत वाढ झाली असून उत्पादकताही २.५ मे.टनांवरून ५ मे.टन वाढली आहे.

४. **स्वयंसहाय्यता महिला बचत गट :** महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने कृषि विज्ञान केंद्राने नाबार्ड योजनेअंतर्गत १०० स्वयंसहायता महिला बचत गट तयार केले आहेत. त्याअंतर्गत आत्तापर्यंत जवळपास २५ गटांनी विविध प्रकारचे स्वयंरोजगार निर्माण केले आहेत. त्यात प्रामुख्याने शेती व्यवसाय, शेळीपालन, दुग्धव्यवसाय, फळप्रक्रिया, सफेद मुसळी प्रक्रिया इ. व्यवसाय सुरू केलेले आहेत. त्यामधून बचत गटांना दरवर्षी ७० हजार ते रु.२ लाखांपर्यंत नफा मिळत आहे.

५. **कृषि अवजारांचा प्रसार :** मजुरांची कमतरता लक्षात घेता केंद्राने शेतीद्वारे आधुनिक कृषि अलजारांचा प्रसार व प्रचार करण्यात येत आहे. केंद्राकडे 'बीबीएफ' पेरणी यंत्र, कॉटन स्लॅशर, बेड मेकर, विविध पीक पेरणी यंत्रे इ. प्रात्यक्षिके शेतकऱ्यांच्या शेतावर घेण्यात येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये कृषि अवजारांविषयी जागृती निर्माण होऊन जवळपास ८ शेतकऱ्यांनी कॉटन स्लॅशर यंत्र घेऊन स्वयंरोजगार निर्माण केला आहे. मागील वर्षी जवळपास १७०० हेक्टर क्षेत्रावर कॉटन स्लॅशरचा वापर करण्यात आला आहे. तसेच, शेतकऱ्यांकडून 'बीबीएफ' पेरणी यंत्राचा वापर जवळपास २०० हेक्टर क्षेत्रावर पेरणीसाठी करण्यात आला आहे.

६. **माती व पाणी परीक्षण :** जमिनीचे आरोग्य सुधारणा व रासायनिक खताचा संतुलित वापर होण्याच्या दृष्टीने केंद्राने २००५ मध्ये माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळेची उभारणी केली आहे, तर २०१२ मध्ये फिरती माती परीक्षण प्रयोगशाळा सुरू करण्यात आली आहे. केंद्राने आत्तापर्यंत १६ हजार ३७१ माती व पाणी नमुन्यांचे परीक्षण केलेले आहे. त्यासोबतच १५ हजार शेतकऱ्यांना त्यांची जमिनीची आरोग्य पत्रिका देण्यात आली आहे.

७. **शेतकरी सुविधा केंद्र :** शेतकऱ्यांसाठी कृषि निविष्ठा व महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाचा प्रचार व प्रसार होण्याच्या दृष्टीने केंद्राने शेतकरी सुविधा केंद्राची उभारणी केलेली आहे. यामध्ये केंद्रामार्फत शेतकऱ्यांना नवीन संशोधित बियाणे, रोपे, कलमे व विविध जिवाणू खते उपलब्ध करून दिली जातात.

८. **किसान मोबाईल संदेश सेवा :** केंद्राने जुलै २०१० मध्ये मराठी भाषेतून किसान मोबाईल संदेश सेवा सुरू केली आहे. आत्तापर्यंत केंद्राने गरजेवर आधारित ४३,८५८ संदेश शेतकऱ्यांना पाठविले आहेत.

९. **अॅझोला व हायड्रोफोनिक्स चारा तंत्रज्ञान :** जनावरांना पूरक पशुखाद्य मिळण्यासाठी केंद्राने मागील दोन वर्षांपासून अॅझोला व हायड्रोफोनिक्स चारा लागवड तंत्रज्ञानाचा प्रसार केला आहे. याअंतर्गत शेतकऱ्यांनी २५ अॅझोला युनिटची उभारणी केली आहे. केंद्रामध्ये सीताफळ, संत्रा, मोसंबी, लिंबू, पेरू या फळझाडांच्या विविध जातींच्या तसेच भाजीपाला पिकांची रोपे उपलब्ध आहेत.

संपर्क : ९५२७५६८७८८

# डॉ. सुधीरकुमार गोयल यांना भावपूर्ण निरोप

## निवृत्तीनिमित्त पुण्यात समारंभ



राज्याचे अपर मुख्य सचिव, (कृषि व पणन) डॉ. सुधीरकुमार गोयल दि. ३० जून २०१५ रोजी सेवानिवृत्त झाले. कृषी आयुक्तालयात त्यांना नुकताच भावपूर्ण निरोप देण्यात आला. कृषी आयुक्त श्री. विकास देशमुख यांच्या हस्ते डॉ. गोयल यांना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देण्यात आले. ''डॉ. गोयल यांचे व्यक्तिमत्व अभ्यासू, हुशार, नि:स्पृह आणि पारदर्शक आहे. त्यांच्या कारकिर्दीत राज्याच्या कृषी विभागाला राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर लौकिक मिळाला. शेतकऱ्यांच्या हितासाठी झटणारे डॉ. गोयल यांनी सुरू केलेले उपक्रम अधिक वृद्धिंगत होतील व शेतकऱ्यांना पूरक ठरतील अशी व्यवस्था भविष्यात निर्माण व्हावी अशी अपेक्षा श्री. देशमुख यांनी व्यक्त केली.

या निरोप समारंभास कृषी संचालक डॉ. सुदाम अडसूळ, श्री. कृ. वि. देशमुख, श्री. सुरेश अंबुलगेकर, डॉ. सुभाष जाधव, डॉ. मधुकर धाग तसेच कृषी सहसंचालक, अधीक्षक कृषी अधिकारी, कृषी उपसंचालक, तंत्र अधिकारी, कृषी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सन्मानाला उत्तर देताना डॉ. गोयल म्हणाले की, ''राज्याचे माजी कृषी सचिव श्री. उमेशचंद्र सरंगी हे आपले आदर्श आहेत. केवळ सांघिक भावनेमुळे व कृषी संचालकांपासून ते कृषी सहाय्यकापर्यंत सर्वांच्या सहकार्यामुळेच कृषी विभागात चांगले काम करता आले.''

डॉ. गोयल यांच्याविषयी श्री. कृ. वि. देशमुख, गोविंद हांडे, डॉ. राम लोकरे, डॉ. मेघना केळकर, श्री. दिलीप झेंडे, विनयकुमार आवटे, श्री. प्रल्हाद पोकळे, डॉ. मधुकर धाग, आदींनी मनोगत व्यक्त केले. अधीक्षक कृषी अधिकारी विनयकुमार आवटे यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

डॉ. गोयल १९८२ मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेत दाखल झाले. सहाय्यक जिल्हाधिकारी, नाशिक या ठिकाणापासून त्यांची प्रशासकीय सेवा सुरु झाली. त्यानंतर याच पदावर धुळे येथे, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. जालना, संचालक महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्था, जिल्हाधिकारी नांदेड, उपसचिव गृहविभाग, आयुक्त सोलापूर महानगरपालिका, आयुक्त कृषी, आयुक्त सहकार, जमाबंदी आयुक्त, महासंचालक यशदा, विभागीय आयुक्त अमरावती, प्रधानसचिव (सहकार व पणन) प्रधान सचिव (कृषी) व अप्पर मुख्य सचिव (कृषी) म्हणून विविध पदांवर काम केले. त्यांच्या नेतृत्वाखाली कृषी विभागाची एक खिडकी, ॲग्रो-ॲडव्हान्टेज महाराष्ट्र, कृषिसप्तक, महापीक अभियान तसेच कृषी वसंत हे देशातील सर्वांत मोठे कृषी प्रदर्शन असे अनेक उपक्रम यशस्वी झाले.

### कृषी विभागात प्रदीर्घ सेवा

**कृषी आयुक्त म्हणून १९९७ ते २००० व पुन्हा २००२ ते २००६ असे जवळपास ७ ते ८ वर्ष व प्रधानसचिव, अपर मुख्य सचिव म्हणून २०११ पासून २०१५ सेवानिवृत्ती पर्यंत म्हणजे ४ वर्ष असे एकूण १२ वर्ष त्यांनी कृषी विभागाचे प्रशासकीय नेतृत्व केले.**